
25-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/24/2025 11:49 PM Page 1



बोरी बायपाससाठी घर गमावण्याची धास्ती » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



चेन्नई- हैदराबादसाठी 'करो या मरो' » पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, २५ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 232 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 25 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### तहव्वूरच्या याचिकेला एनआयएचा विरोध

नवी दिल्ली, दि. २४ : कुटुंबियांशी बोलण्याची परवानगी मागणारी याचिका मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड तहव्वूर राणा याने केली आहे. मात्र, त्याला अशी परवानगी दिली तर तो काही महत्त्वाची माहिती नातेवाईकांना देऊ शकतो, असा युक्तिवाद करत एनआयएच्या वकिलांनी तहव्वूर राणाच्या याचिकेला विरोध केला आहे. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर एनआयए कोर्टाने निर्णय राखून ठेवला. आपल्या कुटुंबियांशी, नातेवाईकांशी बोलण्याचा आपला मूलभूत अधिकार आहे, असा दावा करत राणाच्या वतीने वकिलांनी याचिका दाखल केली आहे.

---

### रशियाचा कीव्हवर ड्रोन हल्ला

कीव्ह, दि. २४ : रशियाने युक्रेनची राजधानी कीव्हवर बुधवारी रात्री क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने हल्ला केला. या हल्ल्यात किमान ८ जणांचा मृत्यू झाला, तर ७० हून अधिक जण जखमी झाले. गेल्या ९ महिन्यांतील युक्रेनच्या राजधानीवरील हा सर्वात मोठा हल्ला आहे. या हल्ल्यामुळे अनेक इमारतींना आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या ४२ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, ज्यात ६ मुले आहेत. काही लोक अजूनही ढिगाऱ्यात अडकले आहेत.

रशियाने युक्रेनवर ७० क्षेपणास्त्रे आणि १४५ ड्रोनने हल्ला केला. ज्यांचे मुख्य लक्ष्य कीव होते. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की म्हणतात की, या हल्ल्याचा उद्देश अमेरिकेवर दबाव आणणे होता. दरम्यान, जुलै २०२४ नंतर कीव्हवर झालेला हा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे.

---

### छत्तीसगडमध्ये कारवाईत ५ नक्षलवादी ठार

बिजापूर, दि. २४ : छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्याच्या कॅरेगुट्टा जंगल भागात मोठी नक्षलविरोधी कारवाई सुरू असून या कारवाईत ५ नक्षलवादी ठार झाले आहेत. देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या नक्षलविरोधी कारवाई मानली जात आहे. कारण यात छत्तीसगड, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील २० हजार सुरक्षा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे. त्यांनी बिजापूर जिल्ह्यातील कॅरेगुट्टा जंगल भागात सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरले असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. ही कारवाई सुमारे ४८ तास सुरू आहे. मोस्ट वॉन्टेड कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा यांच्यासह प्रमुख नक्षलवादी नेत्यांच्या हालचालीबद्दल गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली.

जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स, राज्य पोलिसांच्या सर्व तुकड्या, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि त्यांच्या कमांडो बटालियन फॉर रिझोल्यूट ॲक्शन यांच्यासह विविध तुकड्यांतील सुरक्षा कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले आहेत.

---

### 'स्पाय सॅटेलाईट'ची पाकवर नजर

नवी दिल्ली, दि. २४ : जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी आणि सातत्याने नजर ठेवण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) एका विशेष स्पाय सॅटेलाईट (उपग्रह) च्या प्रक्षेपणासाठी वेगाने काम करत आहे. लवकरच एक विशेष रडार इमेजिंग उपग्रह प्रक्षेपित करण्यास सज्ज आहे. हा उपग्रह दिवसा व रात्री, तसेच ढगाळ हवामानातही चित्रण करू शकतो. त्यामुळे कोणत्याही हवामानात, कोणत्याही वेळेला, भारताच्या सीमेवर घडणाऱ्या घडामोडींवर नजर ठेवणे शक्य होणार आहे.हा उपग्रह स्पाय सॅटेलाइट (गुप्तचर उपग्रह) म्हणून ओळखला जातो कारण त्याच्यापासून लपणे फार कठीण आहे. हा आकाशातील एक अचूक निरीक्षक आहे.

# भारत-पाकिस्तान तणाव वाढला; युद्धाचे संकेत

## अटारी बॉर्डर बंद | सिंधू करार रद्द : आयएनएस विराट सज्ज

**नवी दिल्ली, दि. २४ : पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत कधीही पाकिस्तानवर आक्रमण करेल, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी या अमानुष कृत्याचा निषेध करत बिहारमधून बोलताना जगाला इशारा दिला की , सर्व अतिरेक्यांची पृथ्वीवरील आश्रयस्थाने समूळ नष्ट केली जातील . या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानशी संबंध तोडण्याचे तातडीने महत्त्वाचे निर्णय घेतल्याने आणि त्याला तोडीस तोंड पाकिस्ताननेही भारतावर निर्बंध लादल्याने भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याचे संकेत मिळत आहेत.**



पंतप्रधान मोदी यांनी गुरुवारी बिहारच्या सभेतून इशारा दिला की , दहशतवाद्यांचा हा हल्ला म्हणजे भारताच्या आत्म्यावर हल्ला आहे आणि हा हल्ला करणाऱ्यांना आणि या हल्ल्याचे नियोजन करणाऱ्यांना पृथ्वीच्या कानाकोपऱ्यांतून शोधून काढून शिक्षा दिली जाईल जी त्यांनी कल्पनाही केली नसेल. थोडक्यात मोदींनी थेट पाकिस्तानला इशारा देत सूचित केले की, आता परिणामांना तयार राहा .

दरम्यान दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने गुरुवारी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि अन्य नेते उपस्थित होते.

बैठकीनंतर मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, सर्वच पक्षांनी पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून, जम्मू आणि काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकत्रित प्रयत्न होणे आवश्यक आहे. काँग्रेस नेते व लोकसभा खासदार राहुल गांधी यांनीही आपल्या प्रतिक्रियेत म्हटले की , सर्वपक्षीय बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला असून, विरोधकांनी या मुद्द्यावर सरकारला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे.

दरम्यान, या प्राणघातक हल्ल्याशी संबंधित पाच दहशतवाद्यांची ओळख स्थानिक सुरक्षा यंत्रणांनी पटवली आहे. हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, या दहशतवाद्यांमध्ये तीन पाकिस्तानी नागरिक आणि दोन काश्मिरी तरुणांचा समावेश आहे, ज्यांनी पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण घेतल्याची माहिती मिळत आहे. दहशतवाद्यांनी बैसरन कुरणात जमलेल्या पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला आणि त्यानंतर जंगलात पळून गेले. सुरक्षा दलांकडून शोधमोहीम सुरू आहे. हा हल्ला गेल्या दोन दशकांतील सर्वात भीषण असल्याचे मानले जात आहे.

प्राप्त माहितीनुसार, या हल्ल्यात सहभागी असलेल्यांमध्ये पाकिस्तानातील आसिफ फौजी उर्फ मूसा, सुलेमान शाह उर्फ युनूस आणि अबू तल्हा ऊर्फ आसिफ यांचा समावेश आहे. तसेच, आदिल गुरी आणि अहसान हे काश्मिरी युवक २०१८ मध्ये पाकिस्तानात घुसून प्रशिक्षण घेतल्याचे उघड झाले आहे.

भारताने सिंधु करार रद्द करण्याच्या घोषणेसह पाकिस्तान विरोधात अनेक महत्वाचे निर्णय घेतल्यानंतर पाकिस्ताननेही गुरुवारी आपल्या सुरक्षा समितिची तातडीची बैठक घेतली आणि भारताच्या निर्णयाला प्रत्युत्तर म्हणून भारतासोबत व्यापारी संबंध तोंडण्याच्या निर्णयासह अनेक आव्हानात्मक निर्णय जाहीर केले . यामध्ये भारताच्या विमानांना पाकिस्तानच्या हद्दीत प्रवेश बंदी करण्यात आली आहे . इतकेच नाही तर भारताने जर सिंधु नदीचे पाकीस्तानात येणारे पाणी थांबवले तर पाकिस्तान या परिस्थितीला भारतासोबत युद्ध सुरू झाले असे समजेल असा थेट इशाराच पाकिस्तानने भारताला दिलाय. त्यामूळे पुढच्या दोन दिवसात अनेक महत्वाच्या घडामोडी घडणार असून भारत सध्या समुद्रात आपली युद्ध सज्ज्ता तयार ठेवण्याच्या प्रयत्नात आहे.

### भारताने पाकिस्तान विरोधात घेतलेले निर्णय

- १९६०चा सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा करार तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात येईल, जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलिकडच्या दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत ही स्थगिती लागू राहील.
- अटारी बॉर्डर तात्काळ प्रभावाने बंद. ज्या पाकिस्तानी नागरिकांनी सीमा ओलांडली आहे, त्यांना १ मे २०२५ पर्यंत यामार्गाने भारत सोडण्याचे आदेश.
- सार्क व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्या कोणत्याही पाकिस्तानी नागरिकाला भारत सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत देण्यात आली आहे.
- नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण/लष्करी, नौदल आणि हवाई सल्लागारांना 'पर्सना नॉन ग्राटा' घोषित करण्यात आले. त्यांना भारत सोडण्यासाठी एक आठवड्याची मुदत देण्यात आली.
- इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून भारताच्या संरक्षण / नौदल / हवाई सल्लागारांना परत बोलावण्यात आले.
- १ मे २०२५ पर्यंत आणखी कपात करून उच्चायुक्तालयात काम करणाऱ्यांची संख्या ५५ वरुन ३० पर्यंत कमी केली जाईल.

### पाकिस्तानने भारताविरोधात घेतलेले निर्णय

- सिंधू जल करार स्थगित करण्याचा भारताचा निर्णय पाकिस्तानने फेटाळला. सिंधू जल करारानुसार पाकिस्तानच्या हक्काचे पाणी थांबवल्यास हे युद्धासमान कृत्य समजून त्याला सर्व शक्तीने प्रत्युत्तर दिले जाईल.
- भारताच्या विमानांसाठी पाकिस्तानची हवाई हद्द बंद.
- भारताशी, तसेच भारताच्या माध्यमातून इतर देशांशी होणारा सर्व व्यापार त्वरित स्थगित.
- सार्क व्हिसा योजनेअंतर्गत भारतीय नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा त्वरित रद्द केले. शीख धर्मीय यात्रेकरूंना अपवाद देणार. पाकिस्तानात असलेल्या भारतीय नागरिकांनी (शीख यात्रेकरूंशिवाय) ४८तासांत देश सोडावा.
- पाकिस्तानमधील भारतीय संरक्षण, नौदल व हवाई सल्लागारांना ३० एप्रिल पर्यंत देश सोडण्याचे निर्देश. त्यांच्या कर्मचाऱ्यांनाही परतण्याचे आदेश.
- इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ३० वर आणली
- भारत जोवर पाकिस्तानात दहशत पसरवणे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन थांबवत नाही, तोवर पाकिस्तान शिमला करारासह भारतासोबतचे सर्व द्विपक्षीय करार स्थगित करणार असल्याची पाकिस्तानकडून घोषणा.
- वाघा सीमा त्वरित बंद करण्याचा निर्णय. या मार्गावरील भारतातून होणारी सर्व वाहतूक त्वरित थांबवली. परवान्यांसह गेलेले लोक ३० एप्रिलपर्यंत परत येऊ शकतील.

# गोमंतकीयांनो.. आरोग्य सुदृढ ठेवा !

**▶ मुख्यमंत्री : साखळीत आरोग्य शिबिर, वाढदिनी जाहीर कार्यक्रम टाळला**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**साखळी : आरोग्य शिबिरात संवाद साधताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत.**

**डिचोली, दि. २४ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना आपल्या वाढदिनी राज्यभरातून चाहत्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षांव केला. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस साजरा न करता त्यांनी पुष्पगुच्छ केक आदींना नकार देत हस्तांदोलन करून शुभेच्छा स्वीकारल्या. अनेक ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. त्याचा अनेकांनी लाभ घेतला. साखळीतही मेगा आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला भेट दिल्यानंतर गोमंतकीयांनो आपले आरोग्य निरोगी राखा हीच आपणास मोठी भेट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेल्यांच्या प्रती दुखवटा असल्याने मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी वाढदिवस जाहीररीत्या साजरा करणार नसल्याचे बुधवारी जाहीर केले होते, मात्र तरीही त्यांच्या चाहत्यांनी साखळी येथील त्यांच्या निवासस्थानी मोठी गर्दी केली होती. केक, पुष्पगुच्छ आणले होते, मात्र मुख्यमंत्र्यांनी त्यास नकार देत केवळ हस्तांदोलन करून शुभेच्छा स्वीकारल्या.

तत्पूर्वी, मुख्यमंत्र्यांनी सकाळी विविध मंदिरांना भेट देऊन आशीर्वाद घेतले तसेच गोमंतकीय जनतेच्या उज्ज्वल भविष्यासाठी, आरोग्यासाठी प्रार्थना केली.

साखळी भाजपतर्फे रवींद्र भवनमध्ये आयोजित केलेल्या मेगा आरोग्य शिबिराला डॉ. सावंत यांनी भेट दिली व त्या ठिकाणी आलेल्या लोकांची विचारपूसही केली.

# ना बॉडी , ना कॅमेरा.. मोबाईलद्वारे कारवाई सुरू

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. २४ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी वाहतूक नियमांच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानंतर, आता दिवसा फक्त बॉडी कॅमेरे परिधान केलेले पोलिस निरीक्षकच वाहतूक उल्लंघन प्रकरणांमध्ये चलन (दंड) बजावू शकतात. यामुळे इतर कर्मचाऱ्यांना थेट कारवाईचा अधिकार नसल्याने, ते नियमभंग करणाऱ्या वाहनांचे फोटो मोबाईलद्वारे काढून पोलिस ठाण्याकडे पाठवत आहेत.

हेराल्ड मीडियाशी बोलताना एका वरिष्ठ वाहतूक पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की , सध्याच्या नियमांनुसार दिवसा आणि रात्री दोन्ही वेळा फक्त निरीक्षक पदावरील अधिकारीच चलन बजावू शकतात. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत की, ते नियमभंग करणाऱ्या वाहनांचे फोटो घेऊन पोलिस ठाण्यात पाठवावेत. त्यानंतर नोंदणीकृत वाहनमालकांना एसएमएसद्वारे माहिती दिली जात आहे.

या नव्या नियमांचा कितपत परिणाम झाला, असा प्रश्न विचारल्यावर, अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, प्रारंभी काही अडचणी होत्या कारण कर्मचाऱ्यांना नव्या पद्धतीची सवय नव्हती. मात्र, आता परिस्थिती सामान्य होत चालली आहे.

सुरुवातीला चलनांच्या संख्येत घट झाली होती. मात्र, आता वाहतूक कर्मचारी नियमितपणे फोटो पाठवत असून, त्यानुसार चलने बजावली जात आहेत. यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता आणि काही प्रमाणात भीती निर्माण झाली आहे. अलीकडेच शहरात अनधिकृत पार्किंगप्रकरणी २५ पर्यटक टॅक्सींवर कारवाई करण्यात आली आहे, असे त्यांनी नमूद केले.

मात्र, दुसऱ्या एका वाहतूक पोलिस कर्मचाऱ्याच्या मते, नवीन धोरणामुळे दंडाच्या घटनांमध्ये मोठी घट झाली आहे. सध्या दिवसा आणि रात्री फक्त निरीक्षकच चलन बजावू शकतात. मात्र सर्वच वेळेस निरीक्षक रस्त्यावर उपलब्ध नसतात, त्यामुळे दंडाची संख्या कमी झाली आहे, असे त्यांनी सांगितले. राजधानीत कार्यरत आणखी एका वाहतूक कर्मचाऱ्याने याला दुजोरा दिला. यामुळेच सध्या रस्त्यांवर डिजिटल चलन मशीनसह पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी नुकत्याच दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले होते की, स्थानिक आणि पर्यटकांवरील अनावश्यक त्रास टाळण्यासाठी, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड फक्त बॉडी कॅमेरे असलेल्या पोलिस निरीक्षकांकडूनच लावण्यात यावा. हेड कॉन्स्टेबल, कॉन्स्टेबल किंवा सहाय्यक पोलिस निरीक्षक यांना चलन जारी करण्याचा अधिकार राहणार नाही. जर कोणी अशा पदावरील पोलिस कर्मचारी नियमबाह्यपणे चलन बजावताना आढळले, तर नागरिकांनी त्यांचा फोटो घेऊन पोलिस विभागाकडे पाठवावा. संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, अशी कठोर भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे.

# काश्मीरमधील हल्ल्याची धग गोव्यात

## पर्यटकांचे बुकिंग रद्द | ८ जोडप्यांसह २३ पर्यटक गोव्यात परतल्याची माहिती टूर ऑपरेटरांची माहिती

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २४ :** पहलगामजवळील बैसरन भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेले सर्व गोवेकर पर्यटक सुट्ट्या अर्धवट सोडून सुखरूपपणे गोव्यात परतले आहेत. बुधवारी उशिरा आठ जोडपी आणि गुरुवारी २३ पर्यटक गोव्यात परतल्याची माहिती टूर ऑपरेटरांनी दिली.

गोव्यातील टूर ऑपरेटर महेश म्हांबरे यांनी सांगितले की, गुलमर्ग गंडोला राईडसाठी बुकिंगमध्ये दोन तासांचा उशीर झाल्यामुळे आठ जोडप्यांना नियोजित दिवशी पहलगामला जाता आले नाही. त्यांना मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागाला भेट द्यायची होती. त्याच दिवशी दहशतवादी हल्ला झाला. मला काश्मीरमधील स्थानिक भागीदाराकडून या घटनेबाबत फोन आला आणि मी तात्काळ पर्यटकांना श्रीनगरमध्येच थांबण्याचे निर्देश दिले.

म्हांबरे पुढे म्हणाले की, सरकारने विशेष उड्डाणांची व्यवस्था करून पर्यटकांच्या परतीची तातडीने व्यवस्था केली. सुरक्षित परतीनंतर मी सर्व प्रवाशांशी संपर्क साधला. सर्वजण या घटनेने हादरले आहेत. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की हा हल्ला कोणत्याही धर्मावर नव्हे, तर भारतावरच आहे. स्थानिक व्यावसायिक आपल्या उत्पन्नावर झालेल्या परिणामामुळे हळहळ व्यक्त करत होते.

सावंतवाडी येथील ट्रॅव्हल बगचे संचालक अमित सामंत यांनी सांगितले की, २१ एप्रिल रोजी आम्ही काश्मीरमध्ये दाखल झालो होतो. आम्ही चंदनवारीला भेट दिली असताना बैसरनकडे जायच्या तयारीत होतो. तेव्हाच अचानक एक व्यक्ती रक्तबंबाळ अवस्थेत धावत आली. त्यानंतर गोळीबाराचे आवाज ऐकू आले. लष्करी जवानांनी परिस्थिती नियंत्रणात घेत आम्हाला सुरक्षित स्थळी हलवले.

दरम्यान, पहलगाम परिसरातील हल्ल्यानंतरही काही गोवेकरांनी काश्मीरमध्ये पर्यटन करण्याचा निर्धार कायम ठेवला आहे, तर काहींनी त्यांच्या बुकिंग्स रद्द केल्या आहेत. पणजीतील ट्रेड विंग्सचे महाव्यवस्थापक वेलिग्नो डायस यांनी सांगितले की, आमचा एक गट नुकताच परतला असून येत्या ८ ते १२ मे दरम्यान अनेक गट निघणार आहेत. ३० एप्रिलचा गट सध्या पुढे ढकलून १० मेला पाठवण्यात येणार आहे. पर्यटकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी मी स्वतः एका गटासह काश्मीरला जाण्याचा विचार करतो.

डायस यांच्या माहितीनुसार, सध्या काश्मीरमध्ये कोणताही गोवेकर अडकलेला नाही. ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशन ऑफ इंडिया (टीएएआय)च्या काश्मीर चॅप्टरने पर्यटकांसाठी विशेष हेल्पलाइन सुरू केली आहे.

टीएएआय गोवा चॅप्टरचे अध्यक्ष तिमोतिओ कोलासो यांनी सांगितले की, काश्मीरमध्ये काही गोवेकर आहेत, याची आम्हाला माहिती आहे. मात्र ते आमचे सदस्य नसल्याने संपूर्ण माहिती मिळालेली नाही. काश्मीर चॅप्टरकडून हेल्पलाइन कार्यरत असून, कोणतीही अडचण उद्भवल्यास पर्यटकांना आवश्यक ती मदत केली जात आहे.एअरलाईन्स कंपन्यांनी देखील प्रवाशांसाठी विशेष सवलत जाहीर करत १५ मेपर्यंत तिकिटांचे पुनर्निर्धारण आणि रद्दीकरण शुल्क माफ केले आहे.णजीतील पी बी ए हॉलिडेजचे संचालक निलेश शाह यांनी सांगितले की, १० ते १३ गोवेकरांनी सुरक्षेच्या कारणास्तव प्रवास रद्द केला असून, त्यांचे पैसे परत करण्यात आले आहेत. एअरलाईन्सनेही कोणतीही अडचण न करता परतीची रक्कम परत केली.